आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२५

ठळक बातम्या

- भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकन डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण होत नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन.
- महाराष्ट्रातील महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकास करणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नांदेडमध्ये घोषणा.
- आदिवासी जिल्ह्यांचे मागासलेपण दूर होणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे 'एम्स' नागपूरच्या आंतरराष्ट्रीय 'फिस्ट २०२५' परिषदेत प्रतिपादन.
- भंडाऱ्यामध्ये तीन दिवसीय कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन शेतकऱ्यांची लक्षणीय उपस्थिती.
-

आता सविस्तर बातम्या .......

अर्थसंकल्प

देशातल्या प्रामाणिक करदात्यांमुळ अर्थव्यवस्थेला मोलाचं योगदान मिळत असून, त्यांच्याकरता करांमधे सवलत देण्याचं उद्दिष्ट, यंदाचा अर्थसंकल्प तयार करताना होतं असं, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प काल संसदेत सादर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पी.टी.आय. या वृत्तसंस्थेला त्यांनी मुलाखत दिली. कर आकारणी सुलभ आणि सोपी असावी त्यामुळ कर भरणा प्रामाणिकपणे करण्याला प्रोत्साहन मिळतं. भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून, अमेरिकन डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत, भारतीय रुपयाची घसरण होत नाहीये असं, त्या या मुलाखतीत म्हणाल्या.

नवपर्व व कलशारोहण

येत्या पाच वर्षामध्ये महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रध्दा स्थळांचा विकास करण्याचा संकल्प राज्य शासनानं केला आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी आज नांदेड जिल्हयातील महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हदगाव इथल्या श्रीगुरुवर्य बापू नगर परिसरातील, श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराच्या, नवपर्व आणि कलशा रोहण सोहळ्यात उद्घाटक म्हणून केलं.

*या पाच वर्षांच्या काळामध्ये जेवढे प्रमुख स्थानं आपल्या महानुभाव पंथाचे आहेत, त्या सगळ्या स्थानांचा विकास करण्याचा संकल्प आम्ही घेतलेला आहे आणि त्याचं काम आपण निश्चितपणे पूर्ण करू.*

रिद्धपुरचा पांचाळेश्वर, जाळीचा देव, गोविंदप्रभू देवस्थान या अनेक ठिकाणी संवर्धनाचं काम सुरु आहे. याही पुढे हे कार्य सुरू राहील असं आश्वस्थ केलं. या स्थळांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटविण्यासाठी चर्चेतून मार्ग काढून इथली विकास कामे केली जातील. चांगल्या कामांसाठी राज्य सरकार ताकदीनं पाठिशी उभे राहील असं त्यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी महानुभाव पंथीयांच्या ग्रंथ प्रेमाची, धर्म साहित्य निर्मितीच्या चिकाटीचं कौतुक केलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, राजमान्यता मिळाली. यात महानुभाव साहित्याचा मोठा वाटा आहे. आपण जे पुरावे दिले आणि जे स्वीकारले गेले. यातील एक महत्वाचा पुरावा, लीळाचरित्र होते असंही फडणवीस म्हणाले.

‘हर कंठ में भारत’

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं आज नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं, ‘हर कंठ में भारत’ हा विशेष शास्त्रीय संगीत कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम आजपासून १६ फेब्रुवारीपर्यंत दररोज २१ आकाशवाणी केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते साडेदहा पर्यंत थेट प्रक्षेपित केला जाईल. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव, अरुणिश चावला आणि प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गौरव द्विवेदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आकाशवाणीच्या महासंचालक, डॉ.प्रग्या पालीवाल याही यावेळी उपस्थित होत्या. ‘हर कंठ में भारत’ हा उपक्रम युवा कलाकारांना त्यांची प्रतिभा राष्ट्रासमोर सादर करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करेल असं, सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव, अरुणिश चावला यांनी आकाशवाणीशी विशेष संवाद साधताना सांगितलं. या कार्यक्रमात शास्त्रीय आणि लोक संगीताच्या सर्व प्रकारांचा समावेश असेल अशी

माहिती त्यांनी दिली. सांस्कृतिक मंत्रालयाचा हा एक अनोखा उपक्रम असून, त्यामुळ केवळ कलाकारांनाच नव्हे तर, आकाशवाणीलाही तिचा, श्रोतृवर्ग वाढवण्यासाठी सहाय्यभूत ठरेल असं, आकाशवाणीच्या महासंचालक, डॉ.प्रग्या पालीवाल यांनी म्हटलं आहे.

*आज का जो दुर्लभ संयोग है कि लक्ष्मी और सरस्वती दोनों का इस तरह से एक संयोग बना है। आज हम लोग यह विशेष संगीत श्रृंखला 'हर कंठ में भारत' लॉन्च कर रहे हैं। यह 21 केंद्रों से प्रसारित किया जाएगा एक साथ, जो सेक्रेटरी कल्चर का जो एक विज़न था कि पूरा देश में शास्त्रीय संगीत गुंजे, और इसमें आकाशवाणी की एक प्रमुख भूमिका है, आकाशवाणी के कलाकारों की प्रमुख भूमिका है, उससे और बढ़ेगा।*

वसंत पचंमी

देशभरात आज वसंत पंचमी साजरी होत आहे. या दिवशी विद्येची देवता सरस्वती देवीची पूजा केली जाते तसंच वसंत ऋतूचं स्वागत करून निसर्गातील नवनिर्मितीचा उत्सव साजरा केला जातो. पंढरपुरात आज पंचमीच्या मुहूर्तावर विठ्ठल-रुख्मीणीचा विवाह सोहळा झाला. विदर्भाचे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या नागपूर जिल्हयाच्या कळमेश्वर तालुक्यातील, श्रीक्षेत्र धापेवाडा इथं आजपासून वसंत पंचमी उत्सवाला सुरुवात झाली ज्यांच्यामुळ इथं विठ्ठल रुक्मिणी मंदिर झालं त्या संत कोलबा स्वामी महाराजांनी ३३१ वर्षांपूर्वी हा उत्सव सुरू केला होता.

ट्रायबल हेल्थ परिषद

आदिवासी भागांमधील सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण दूर करणे हे आपल्यापुढील सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यादृष्टीनं सरकार सातत्यानं काम करत आहे. आदिवासी बहुल जिल्हयांच्या विकासाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात येत आहे. परंतु सर्वसमावेशक विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे असं प्रतिपादन, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानं, ‘एम्स’ नागपूर इथं

आंतरराष्ट्रीय 'फिस्ट-२०२५' या आंतराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं. त्यावेळी गडकरी बोलत होते. आदिवासी भागांमधील परिस्थिती गंभीर आहे. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात अनेक अडचणी आहेत. इथल्या युवकांना कौशल्य प्रशिक्षणाची गरज असल्याचं ते म्हणाले...

*कोई स्कीम अच्छी लाओ, ऐसी स्कीम लाओ की जो नॉलेज के साथ ट्राइबल युवाओं को कुछ करने का उनको मौका मिलेगा। ये सब स्कीम को फ्री थिंग करो स्किल्ड इस इम्पोर्टेन्ट।*

दरम्यान, या आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित एम्स नागपूर येथे होत आहे.

कृषी प्रदर्शन

कृषी विभाग आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमानं, भंडारा जिल्ह्यातील पिंपळगाव सडक इथं तीन दिवसीय कृषी प्रदर्शन आणि कृषी विकास परिषद तसंच शंभर वर्षाची परंपरा असलेल्या शंकर पटाचं आज उद्घाटन करण्यात आलं. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून नाना पटोले, उद्घाटक म्हणून लोकसभा खासदार डॉ.प्रशांत पडोळे तर प्रमुख अतिथी म्हणून, भंडारा-गोंदियाचे राज्यसभा खासदार प्रफुल पटेल उपस्थित होते. या कृषी प्रदर्शनीमध्ये कृषि प्रदर्शन, पशुपक्षी प्रदर्शन, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषि आणि संलग्न व्यवसाया बाबत चर्चासत्र तसंच परीसंवाद, शेतकरी सन्मान समारंभ, महिला बचत गट निर्मित वस्तुंचं प्रदर्शन आणि विक्री ही प्रदर्शनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

क्रिकेट-भारत आणि इंग्लंड अंतिम सामना

भारत आणि इंग्लंड यांच्यातील मर्यादित वीस षटकांच्या मालिकेतील, पाचवा आणि अंतिम सामना आज मुंबईत, वानखेडे मैदानावर होणार आहे. आज सायंकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे. भारतानं या मालिकेत **3-1** अशी विजयी आघाडी घेतली आहे. या मालिकेनंतर सहा फेब्रुवारीपासून, पन्नास षटकांच्या एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. दरम्यान, येत्या सहा फेब्रुवारी रोजी नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन अर्थात

व्ही.सी.ए.स्टेडीयम जामठा इथं भारत विरुद्ध इग्लंड एक दिवसीय सामन्याच्या दिवशी नागपूर शहर परिसरातील वाहतुक कोंडी रोखण्यासाठी मनपा सज्ज असून, याकरीता विशेष बस सेवेचं आयोजन करण्यात येत आहे. बससेवा पंचशिल चौक, सिताबर्डी इथून जामठा स्टेडीयम करीता सकाळी नऊ वाजेपासुन ते रात्री उशीरापर्यंत दर **15** मिनिटांच्या अंतरानं सुरु राहतील. या सामन्याकरीता पुरविण्यात येणाऱ्या बसेस, नियमित तिकीट दरानं चालविण्यात येईल या व्यतिरीक्त प्रवाश्यांच्या सोयीसाठी, जामठा टी-पॉईट जवळ, स्पॉट तिकीट बुकींगची व्यवस्था सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सभापती हत्या

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड पंचायत समितीचे माजी सभापती सुखराम मडावी यांची काल नक्षलवाद्यांनी गळा दाबून हत्या केल्याचं वृत्त आहे. मडावी हे भामरागड तालुक्यातल्या, कियर इथले रहिवासी होते. २०१७ ते २०१९ अशी अडीच वर्षे ते भामरागड पंचायत समितीचे सभापती होते. सध्या ते उपसभापती म्हणून कार्यरत होते. घटनास्थळी नक्षलवाद्यांचं एक पत्रक सापडलं असून, त्यात सुखराम मडावी हे पोलिस खबरी होते. त्यांनी ठिकठिकाणी पोलिस मदत केंद्र उघडण्यास आणि लोहखाणीला समर्थन देणारं काम केले म्हणून त्याची हत्या केल्याचा मजकूर आहे.

प्राप्तीकरात सवलती

यंदाच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या कर सवलतीं हेच, प्रमुख वैशिष्ट्य असल्याची प्रतिक्रीया उद्योग जगतानं व्यक्त केली आहे. बारा लाख रुपयां पर्यंतचं उत्पन्न पूर्णपणे करमुक्त करणं हाच, यंदाच्या अर्थसंकल्पातला सर्वात महत्त्वाचा मुद्दा असल्याचं मत, उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांनी मांडलं आहे. यामुळ मध्यम वर्गीयांच्या हातात अधिक पैसे येतील, ज्यामुळे वस्तू, दुचाकी आणि प्रवास या क्षेत्राला चालना मिळेल, असं बिर्ला यांनी सांगितलं.

*****